THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 20TH MARCH 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## हिंदुस्तान सरकार.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजा बहादुर गव्हर्नर जनरल यांनीं तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८९० रोजीं मंजूर केला; तो लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला आहे:—

### सन १८९० चा आक्ट नंबर १.

**कांहीं प्रकारचीं सरकारचीं येणीं वसूल करण्यास हल्लींच्यापेक्षां अधिक चांगली तजवीज व्हावी यासाठीं आक्ट.**

ज्या अर्थीं कांहीं प्रकारचीं सरकारचीं येणीं वसूल करण्यास हल्लींच्यापेक्षां अधिक चांगली तजवीज होणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) ह्या आक्टास सन १८९० चा महसूल वसूल करण्याबाबत आक्ट असें ह्मणावें. सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो, उत्तर ब्रह्मदेश व ब्रिटिश बलुचिस्तान धरून सगळ्या ब्रिटिश इंडियास लागू आहे; आणि

(३) तो लागलाच अमलांत येईल.

२. ह्या आक्टांत, विषयावरून अथवा संदर्भावरून बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(१) "जिल्हा" ह्या शब्दांत इलाका-शहराचा समावेश होतो असें समजावें:

(२) "कलेक्टर" या शब्दाचा अर्थ, जिल्ह्याच्या जमीनमहसुलाची व्यवस्था ताब्यांत असणारा मुख्य अमलदार असें समजावें: आणि

(३) " महसूल न देणारा " ह्मणजे, जमीनमहसुलाची बाकी, अथवा जमीनमहसुलाच्या बाकीदाखल वसूल व्हावयाची कांहीं एक रकम ज्याकडून येणें आहे तो इसम, असें समजावें; आणि त्या संज्ञेत, अशा प्रकारची कोणतीहि बाकी अगर रकम देण्याबद्दल जामीन झाल्यामुळें जबाबदार असणाऱ्या इसमाचा समावेश होतो असें समजावें.

ज्या जिल्ह्यांत सरकारचीं देणीं निघतात त्यांहून दुसऱ्या जिल्ह्यांत त्यांचा प्रोसेसच्या बजावणीनें वसूल.

३. (१) जमीनमहसुलाची बाकी अथवा जमीनमहसुलादाखल वसूल व्हावयाची कोणतीहि रकम महसूल न देणाऱ्याकडून एकादे कलेक्टराकडे देणें झाली असेल व महसूल न देणारा ज्या जिल्ह्यांत सदर्हू बाकी थकली असेल अथवा रकम देणें झाली असेल त्या जिल्ह्याहून दुसऱ्या जिल्ह्यांत राहात असेल अथवा तेथें त्याची मालमिळकत असेल तेव्हां सदर्हू कलेक्टरानें सदर्हू दुसऱ्या जिल्ह्याच्या कलेक्टराकडे साधेल तेथपर्यंत परिशिष्टांत दिलेल्या नमुन्याबरहुकुम दाखला पाठवावा; त्या दाखल्यांत

(अ) महसूल न देणाराचें नांव आणि तो ओळखतां येण्यास आवश्यक अशी दुसरी कांहीं विशेष माहिती, आणि

(ब) त्याजकडून येणाऱ्या रकमेचा आंकडा आणि ज्या बाबतींबद्दल ती रकम येणें असेल ती बाबत,

ह्या गोष्टी नमूद केल्या पाहिजेत.

(२) ज्या कलेक्टरानें सदर्हू दाखला तयार केला असेल, त्यानें त्याजवर आपली सही केली पाहिजे, आणि, ह्या आक्टांत इतर रीतीनें ठरविलें असेल ते प्रसंग खेरीजकरून, तो दाखला त्यांत नमूद केलेल्या गोष्टींविषयीं निरुत्तर पुरावा समजला जाईल.

(३) सदर्हू दाखला पोहोंचल्यावर सदर्हू दुसऱ्या जिल्ह्याच्या कलेक्टरानें, त्या दाखल्यांत नमूद केलेली रकम, खुद्द आपल्या जिल्ह्यांत थकलेल्या जमीनमहसुलाच्या बाकीप्रमाणें वसूल करण्याची तजवीज करावी.

वरील शेवटल्या कलमाबरहुकुम वसूल केलेली रकम देण्याच्या पात्रतेविषयीं इनकार करणाऱ्या इसमास करतां येणारा उपाय.

४. (१) दाखल्यांत नमूद केलेली रकम वसूल करण्याकरितां सदर्हू शेवटल्या कलमाबरहुकुम जेव्हां एकाद्या इसमाविरुद्ध काम चालविलें जाईल, तेव्हां जर सदर्हू इसमानें सदर्हू रकम अथवा तिचा कोणताहि भाग देण्यास आपण पात्र असल्याचें नाकबूल केलें, आणि सदर्हू रकम अथवा तिचा सदर्हू कोणताहि भाग द्यावयाच्या वेळेस लेखी तक्रार आपल्या अथवा आपल्या गुमास्त्याच्या सहीनिशीं करून, सदर्हू रकम अथवा तिचा सदर्हू कोणताहि भाग दिला, तर, याप्रमाणें दिलेली रकम अथवा तिचा सदर्हू भाग परत मिळण्याकरितां दावा आणण्याचा त्या इसमास अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) याबरहुकुम दावा, सदर्हू दाखला ज्या कलेक्टरानें दिला असेल त्या कलेक्टराची कचेरी ज्या प्रदेशांत असेल त्या प्रदेशांत हुकुमत असणाऱ्या दिवाणी कोर्टांत केला पाहिजे; आणि ज्या जागीं ती बाकी थकली असेल अगर ती रकम देण्याची पात्रता जेथें उत्पन्न झाली असेल त्या जागीं चालू असलेल्या कायद्यास अनुसरून त्या दाव्याचा निकाल केला जाईल.

(३) सदर्हू दाव्यांत, दाखल्यांत नमूद केलेल्या कोणत्याहि बाबतींविषयीं पुरावा देण्याचा वादीस अधिकार आहे. मग असें करण्यानें गेल्या शेवटल्या कलमांतील ठरावांस विरोध आल्यास चिंता नाहीं. मात्र असें करणें हें सदरील जागेंत चालू असलेल्या कायद्यास पात्र राहील.

इतर सरकारी अमलदार अथवा स्थानिक अधिकारी यांनीं

५. जेव्हां कलेक्टराहून इतर कोणत्याहि सरकारी अमलदारास अथवा कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्यास जमीनमहसुलाच्या बाकीप्रमाणें कोणतीहि रकम वसूल

करणें असेल तेव्हां, सदर्हू अमलदाराची अथवा अधिकाऱ्याची कचेरी ज्या जिल्ह्यांत असेल, त्या जिल्ह्याच्या कलेक्टरानें, सदर्हू अमलदाराच्या अथवा अधिकाऱ्याच्या विनंतीवरून, ती रकम, आपल्या जिल्ह्यांत थकलेल्या जमीनमहसुलाच्या बाकीप्रमाणें, वसूल करण्याची तजवीज केली पाहिजे; आणि आपणाकडे यावयाच्या रकमेप्रमाणें त्या वसूल करावयाच्या रकमेचा दाखला दुसऱ्या जिल्ह्याच्या कलेक्टराकडे ह्या आक्टाच्या सदरील ठरावांवरहुकुम पाठविण्याचा त्यास अधिकार आहे. महसुलाची बाकी ह्मणून वसूल करावयाच्या रकमांचा कलेक्टरांकडून वसूल.

ह्या आक्टावरून विकरीस पात्र होणारी मालमिळकत.

६. (१) ह्या आक्टावरहुकुम दाखला जिल्ह्याच्या कलेक्टरच्या हातीं आल्यावर, महसूल न देणाऱ्या इसमाची सदरील जिल्ह्यांत असलेली कोणतीहि स्थावर मालमिळकत दुसऱ्याच्या नांवें करून देऊं नये अथवा तिजवर देण्याचा बोजा घालूं नये ह्मणून जाहिरनामा देण्याचा त्यास अधिकार आहे.

(२) कोणत्याहि वेळीं लेखी हुकूम देऊन सदर्हू जाहिरनामा रद्द करण्याचा कलेक्टरास अधिकार आहे, आणि दाखल्यांत नमूद केलेली रकम वसूल झाल्यावर अथवा ती रकम वसूल करण्याकरितां त्या मालमिळकतीची विक्री झाल्यावर तो जाहिरनामा रद्द झाला आहे असें समजलें जाईल.

(३) जाहिरनामा दिल्यावर, आणि तो रद्द होण्याच्या पूर्वीं, विक्रीनें, देणगीनें, गहाण ठेवून अथवा दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें सदरील मालमिळकत अथवा महसूल न देणाऱ्याचा तींतील कोणताहि हक्कसंबंध खासगी रीतीनें परहस्तगत केला असतां तें कृत्य सरकारच्या आणि दाखल्यांत नमूद केलेली रकम वसूल करण्याकरितां केलेल्या लिलांवाच्या वेळीं ती मालमिळकत जो कोणी विकत घेईल त्याच्या संबंधानें रद्द आहे असें समजलें जाईल.

(४) दाखल्यांत नमूद केलेली रकम वसूल करण्याकरितां जेव्हां कोणत्याहि स्थावर मालमिळकतीविरुद्ध ह्या आक्टाअन्वयें काम चालविलें जाईल तेव्हां, ह्या कलमाच्या वरील ठरावांस पात्र राहून, सदरील मालमिळकतींतील फक्त महसूल न देणाऱ्या इसमाच्या हक्कसंबंधाविरुद्ध मात्र तें काम चालविलें जाईल; आणि त्यानें इमानानें उत्पन्न केलेले कोणतेहि देण्याचे बोजे, दिलेल्या देणग्या, अगर केलेले करार, हीं, सदर्हू हक्कसंबंधांविरुद्ध काम चालविलें एवढ्याच कारणावरून रद्द होणार नाहींत.

(५) या कलमाअन्वयें जाहिरनामा देणें तो दवंडी पिटवून अगर दुसऱ्या एकाद्या चालू रीतीनें, आणि त्याची एक प्रत, तो ज्या मालमिळकतीच्या संबंधाचा असेल त्या मालमिळकतींतल्या अगर जवळच्या सर्वांस दिसे अशा जागीं लावून, द्यावा.

७. सदरील कलमांतील कोणत्याहि ठरावावरून— महसुलासंबंधाचे स्थानिक कायदे अमलांत ठेवणें.

(अ) जमीनमहसूल अगर जमीनमहसुलाच्या बाकीप्रमाणें वसूल करावयाच्या रकमा वसूल करण्याबद्दल विवक्षितकाळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि इतर कायद्यानें ठरविलेल्या कोणत्याहि तारणास अगर त्या कायद्याच्या ठरावांस बाध येईल असा, अगर

(ब) विवक्षितकाळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याअन्वयें कोणत्याहि म्युनिसिपालिटीवर अधिकार असणाऱ्या कार्पोरेशनास, कमिशनरास, कमिटीस, बोर्डास, कौन्सिलास अगर मनुष्यास द्यावयाचा कोणताहि कर वसूल करण्याकरितां कोणत्याहि मनुष्यास धरण्याचा अधिकार येईल, असा

त्या ठरावाचा अर्थ करूं नये.

ब्रिटिश इंडियाच्या बाहेर देणें झालेलीं विवक्षित सरकारी देणीं ब्रिटिश इंडियांत वसूल करणें.

८. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या वहिवाटींत असून ब्रिटिश इंडियाचा भाग नसणाऱ्या कोणत्याहि स्थानिक प्रदेशास हा आक्ट लागू केला जाईल तेव्हां, त्या प्रदेशांत जमीनमहसुलाची थकलेली बाकी, अगर जमीनमहसुलाच्या बाकीप्रमाणें वसूल करावयाची व त्या प्रदेशांतील कलेक्टरास अगर इतर सरकारी अमलदारास अगर स्थानिक अधिकाऱ्यास देणें असलेली कोणतीहि, रकम ह्या आक्टाअन्वयें ब्रिटिश इंडियांत वसूल करण्याचा अखत्यार आहे.

---

## परिशिष्ट.

### दाखला.

(कलम ३, पोट-कलम (१) पाहा.)

——————————चे कलेक्टर यांजकडून,

——————————चे कलेक्टर यांस.

तारीख माहे सन १८ .

——————————, बापाचे नांव——————————, राहणार——————————(हा आपल्या जिल्ह्यांत——————————या गांवीं आहे) (याची आपल्या जिल्ह्यांत——————————या गांवीं——————————ही मालमिळकत आहे) असें मानण्यास कारण आहे; सदर्हू इसमाकडून——————————याबाबद रकम——————————रुपये येणें आहे.

सन १८९० च्या महसूल वसूल करण्याबाबदच्या आक्टाच्या ठरावांस अनुसरून, आपल्या जिल्ह्यांतलीच जमीन महसुलाची बाकी थकली आहे असें समजून सदर्हू रकम आपल्यास वसूल करतां येण्याजोगी आहे. ती याप्रमाणें वसूल करून——————————येथील आमच्या कचेरींत पावती करावी अशी या लेखावरून आपल्यास विनंती करण्यांत येत आहे.

अ. ब.,

——————————चा कलेक्टर.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.